**<u>वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३</u>**

**मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: धोरण २०१९/प्र.क्र.३१८/टे-५**
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दि. २७ मे, २०१९.

<u>वाचा</u> : शासन निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक: धोरण २०१७/प्र.क्र.६/टे-५, दि.१५ फेब्रुवारी, २०१८

**<u>प्रस्तावना</u>:**

राज्याचे वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ शासन निर्णय दि. १५.०२.२०१८ अन्वये जाहीर करण्यात आले आहे. या धोरणाच्या आधारे राज्यातील वस्त्रोद्योगाला चालना देण्यासाठी विविध योजना लागू करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तथापि या धोरणातील उद्दिष्टांबाबत व त्याआधारे लागू करण्यात येणाऱ्या योजनेबाबत विविध वस्त्रोद्योग संघटना, माध्यमे व लोकप्रतिनिधी यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या सूचना विचारात घेऊन वेळोवेळी वस्त्रोद्योग धोरणामध्ये काही अनुषंगिक सुधारणा करण्याची आवश्यकता निर्माण होत आहे. या अनुषंगाने मा.मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करून समितीला अधिकार देण्याचे निर्देश मा.मंत्रिमंडळाच्या दि. २०.१२.२०१८ च्या बैठकीत देण्यात आले आहेत. हे विचारात घेता वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ मध्ये आवश्यक सुधारणा करण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ अंतर्गत वस्त्रोद्योगांना चालना देण्यासाठी लागू करण्यात आलेल्या तसेच यापुढे लागू करण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या अंमलबजावणीत येणाऱ्या व्यावहारिक अडचणी विचारात घेऊन वस्त्रोद्योग धोरणात आवश्यक त्या सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

| | | |
|---|---|---|
| १. | मा.मंत्री (वस्त्रोद्योग) | अध्यक्ष |
| २. | मा.मंत्री (ऊर्जा) | सदस्य |
| ३. | मा.मंत्री (उद्योग) | सदस्य |
| ४. | मा.मंत्री (रोजगार हमी) | सदस्य |
| ५. | मा.राज्यमंत्री (वित्त व नियोजन) | सदस्य |
| ६. | मा.राज्यमंत्री (वस्त्रोद्योग) | सदस्य |
| ७. | अपर मुख्य सचिव (वित्त) | सदस्य |
| ८. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (वस्त्रोद्योग) | सदस्य सचिव |

वस्त्रोद्योगाच्या विकासासाठी लागू करण्यात येणाऱ्या विविध योजनांचे स्वरूप विचारात घेवून आश्यकतेप्रमाणे संबंधित विभागाच्या प्रभारी मंत्री/ राज्य मंत्री यांना आमंत्रित सदस्य म्हणून बैठकीला बोलविण्याचे अधिकार समितीचे अध्यक्ष यांना राहतील.

२. मंत्रिमंडळ उपसमितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील.

१. वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ मध्ये निश्चित करण्यात आलेल्या उद्दिष्टांशी अनुरुप वस्त्रोद्योगाच्या विकासासाठी लागू केलेल्या/ करण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या अंमलबजावणीत येणाऱ्या व्यावहारिक अडचणी विचारात घेऊन धोरणात आवश्यक त्या सुधारणा करण्याचा निर्णय घेणे.

२. वस्त्रोद्योग धोरणांतर्गत मागास भागात उद्योग यावेत यासाठी धोरणात काही आवश्यक बदल करावयाचे असल्यास त्याबाबत निर्णय घेणे.

३. वस्त्रोद्योग धोरणातील वस्त्रोद्योगाच्या सर्वांगीण विकासासाठी निश्चित करण्यात आलेल्या उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी उपाययोजना सूचविणे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५२८१२०००६६४०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ashish Anaclet Lopes

Digitally signed by Ashish Anaclet Lopes
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing And Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=97c1663938db95bf4b157b5906fb45b17fdf64e8db800c9618de046d6e51497c, serialNumber=4c69f8b7f13f76b97aa93b0d155291c61823c6e1d678a555f6eb04d1a38750cf, cn=Ashish Anaclet Lopes
Date: 2019.05.28 12:04:30 +05'30'

**(आ.अ.लोपिस)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत:-**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
३. मा.मंत्री (वस्त्रोद्योग), यांचे खाजगी सचिव
४. मा.मंत्री (ऊर्जा), यांचे खाजगी सचिव
५. मा.मंत्री (उद्योग), यांचे खाजगी सचिव
६. मा.मंत्री (रोजगार हमी), यांचे खाजगी सचिव
७. मा.राज्यमंत्री (वित्त व नियोजन), यांचे खाजगी सचिव
८. मा.राज्यमंत्री (वस्त्रोद्योग), यांचे खाजगी सचिव
९. मा.मंत्री (सर्व), यांचे खाजगी सचिव
१०. मा.राज्यमंत्री (सर्व), यांचे खाजगी सचिव
११. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१२. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१३. मा.खासदार (सर्व), महाराष्ट्र राज्य
१४. मा. आमदार (सर्व)
१५. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
१६. सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
१७. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र राज्य १ /२, मुंबई/नागपूर

१८. आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर

१९. संचालक (रेशीम), रेशीम संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.

२०. अवर सचिव/कक्ष अधिकारी, कार्यासन टेक्स-१-अ/ टेक्स-१-ब/ टेक्स-२/ टेक्स-३/ टेक्स-४/ रेशीम कक्ष

२१. निवड नस्ती (टेक्स-५).